# प्रेसनोट

जा.क्र.पोउआ/वाहतूक/मराठा क्रां.मु.मो./पुणे शहर/6042 /२०१७ पुणे, दिनांक – ०७/०८/२०१७

**विषय :- दिनांक- ०९/०८/२०१७ रोजीचे मुंबई येथील मराठा क्रांती(मूक) मोर्चाचे अनुषंगाने वाहतुकी बाबत.**

---

दिनांक ०९/०८/२०१७ रोजी मराठा क्रांती मुक मोर्चा चे आयोजक यांनी मुंबई येथे आयोजन केले असुन सदर मोर्चा करीता सातारारोड, सोलापूररोड, नगररोड या भागातील नागरिक हे त्याचे वाहनाने मोठ्या प्रमाणात मुंबई येथे दिनांक- ०८/०८/२०१७ रोजी पासून जाणार आहेत तसेत मोर्चा समाप्ती नंतर सदर दिवशी तसेच दिनांक-१०/०८/२०१७ रोजी परत सदर मार्गाने जाणार आहे. सदरची वाहने हि शहरातील खालील रस्त्यांवरुन जाणार आहेत.

१. सोलापूर रोडची वाहने हिं हडपसर-गाडीतळ-कोंढवा- कात्रज -बायपास मुंबई-बैंगलोर हायवे यावरुन मुंबईकडे
२. सातारा रोडची वाहने हि मुंबई-बैंगलोर हायवे मुंबईकडे
३. नगररोडचे शिक्रापुर मार्गे चाकणकडे न गेलेली वाहने हि शहरात वाघोली, येरवडा,होळकरपुल वरुन बोपोडी पुणे-मुंबई रोडवरुन मुंबईकडे

सदर मार्गांवर मोर्चाकरीता जाणा-या-येणा-या वाहनांमुळे दैनंदिन रहदारीपेक्षा जास्त प्रमाणात वाहनांची ये-जा होणार आहे. त्यामुळे सदर मार्गावर वाहतुक हि संथ गतीने होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यासाठी योग्य तो बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

तरी सर्व वाहनचालकांना सुचित करण्यात येते की, दिनांक- ०८/०८/२०१७ चे दुपारी १२.०० वा. पासुन दिनांक-१०/०८/२०१७ रोजीचे १२.०० वाजे पर्यंत वर नमुद मार्गांवर जाण्याचे टाळावे अथवा पर्यायी मार्गाने इच्छितस्थळी जाणे बाबत वाहतूक शाखेकडून आवाहन करण्यात येत आहे.

## प्रेसनोट

जा.क्र.-पोउप-आ/वाहतूक/6041 /२०१७ पुणे शहर, दिनांक ०७.०८.२०१७.

**विषय :-रक्षाबंधन निमीत्त वाहतुक शाखेकडून,वाहतुक नियमन जन जागृती अभियान राबविले बाबत.**

----------------oo---------------

पुणे पोलीस आयुक्तालय व वाहतुक नियंत्रण शाखा पुणे शहर यांचेकडून आज दिनांक- ०७/०८/२०१७ रोजी, रक्षाबंधन सणाचे निमीत्ताने वाहतुक शाखेच्या २८ विभागांद्वारे सुमारे दिड लाख वाहनचालकांशी समक्ष संपर्क साधून वाहनचालकांना खालील मजुकराचे जनजागृतीची पत्रके वाटप करण्यात आली आहेत.

१. बहिण भावाला राखी बांधून जशी भावाकडून रक्षणाची अपेक्षा करते, तसेच आम्ही आपणास राखी बांधुन वाहतुक नियमांचे रक्षण करण्यासाठी विनंती करतो.
२. तुमची बहिण/भाऊ सण साजरा करण्यासाठी घरी वाट पाहत आहेत.

यासप्रमाणे नागरिकांना रक्षाबंधन सणाचे महत्व वाहतुक नियमांचे अनुषंगाने विषद करुन सणाचे निमीत्ताने खालील मुख्यत्वे वाहतुकीचे नियमांचे पालन करण्याबाबत अवाहन करण्यात आले.

१.वाहन चालविताना सिट बेल्ट लावा.
२.वाहन चालविताना मोबाईल फोनचा वापर करु नका.
३.लाल सिग्नल तोडू नका व स्टॉप लाईनच्या अगोदर थांबा
४.ट्रिपलसिट बसुन वाहन चालवु नका.
५.ॲम्ब्युलन्सला प्रथम प्राध्यान्य द्या.
६.वाहने रस्त्याच्या चुकीच्या बाजुने चालवू नका.
७.अवजड वाहने रस्त्याच्या डाव्या बाजुने चालवा.
८.दंडाची रक्कम रोख न भरता एटीएम,डेबीट,क्रेडीटकार्ड,पेटीएम,ऑनलाईन द्वारे किंवा व्होडाफोन स्टोअर मधुन भरना करावा.

याप्रमाणे वाहतुकीचे नियमांचे पालन करण्याबाबत नागरिकांना अवाहन करण्यात आले, सदरचे अभियान हे मा.पोलीस आयुक्त पुणे शहर व मा.पोलीस सह आयुक्त पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप आयुक्त,वाहतुक श्री.अशोक मोराळे यांनी व वाहतुक शाखेकडील परिमंडळीय सहा.पोलीस आयुक्त व वाहतुक विभागाचे प्रभारी अधिकारी यांनी यशस्वी राबविले आहे. सदर रक्षाबंधन वाहतुक नियमन जन जागृती अभियानास नागरीकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला आहे.